# पक्षी जाय दिगंतरा...

प्रल्हाद जाधव

या एकांकिकेतील पात्रे :

१.अण्णा (६०)

२.वत्सलाबाई (५५)

३.प्रसाद (३५)

४. सुमित्रा (३०)

(पडदा उघडतो, हळूहळू प्रकाश. पहिल्या मजल्यावरची बैठकीची खोली. जुन्या काळातील लाकडी,नक्षीदार खुर्ची, शिसवी गोल टेबल, एका बाजूला दिवाण. त्यावर बैठकीची गादी, लोड. दुसरीकडे पुस्तकांचे एक छोटेसे कपाट. तेथून खालच्या मजल्यावर जाण्याचा जिना. दिवाणाच्या पुढच्या बाजूला विंगेला लागून खिडकी. खिडकीची थोडीशी चौकट दिसते, बाकीचा भाग विंगेत. खिडकीतून बाहेरचा परिसर दिसतो अशी कल्पना. सोनचाफ्याचे एक झाड खिडकीला लगटूनच वाढलेले आहे. खिडकीतून हात घालून त्यावरची फुले काढता येतात. खिडकीच्या विरूद्ध दिशेला गॅलरीत उभे राहून खालील माणसांशी बोलता येते. पडदा उघडतो तेव्हा सकाळची वेळ. पाखरांचा किलिबलाट ऐकू येतो. खिडकीतून कोवळा प्रकाश आत येत आहे. त्या उजेडात दिवाणावर बसून अण्णू पोथी वाचत आहेत.)

अण्णा :

उदासीन हा काळ जातो गमेना

सदासर्वदा थोर चिंता शमेना

उठे मानसी सर्व सांडूनी जावे

रघुनायका काय कैसे करावे?

जनी चालता बोलता वीट वाटे

नसे अंतरी स्वस्थ कोठे न कंठे

घडीने घडी चित्त किती धरावे

रघुनायका काय कैसे करावे?

जय जय रघुवीर समर्थ ऽऽऽ

वत्सलाबाई : (जिन्यावरून कपबशी घेऊन वर येता येता) आटोपली पूजा?

अण्णा : हो, आटोपली.

वत्सलाबाई: (चहा देत) घ्या! आज सकाळी सकाळीच रघुनायकाला कशाला अडचणीत आणताय?

अण्णा : आपल्या ध्यानीमनी नसतानाही अचानक उदभवलेल्या या संकटातून त्याच्याशिवाय कोण सुटका करणार आहे आपली?

वत्सलाबाई : हो पण आपणच धीर सोडला तर तो तरी काय करणार आपल्यासाठी?

अण्णा : खरं आहे...रात्रभर झोप लागली नाही. तीस वर्षांचा संसार झाला या घरात आपला पण इतका अस्वस्थ झालो नव्हतो कधी मी.

वत्सलाबाई : एवढं काय मनाला लावून घ्यायचं त्यात? अण्णा : मनाला काय लावून घ्यायचं? अगं रात्रीपुरती धर्मशाळेत पाठ टेकणारा यात्रेकरूसुद्धा जेव्हा ती जागा सोडून जायला निघतो तेव्हा निघण्यापूर्वी आपल्या डोळ्यात ती! गहिवरून येतो... आणि जिथं आपण सलगपणे तीस वर्ष वास्तव्य केलं ती जागा तीस दिवसांच्या नोटीशीनं सोडून द्यायची?

वत्सलाबाई : जाऊद्या, सकाळी सकाळी मन:स्ताप करून घेऊ नका. चहा घ्या,थंड होईल. (खिडकीकडे निघत) तुम्ही चहा घ्या तोवर फुलं काढते मी थोडी. बघा कसा बहरून आलाय सोनचाफा तो!

अण्णा : तू कशाला काढतेस? प्रसाद येईल आता वर. तो देईल काढून.

वत्सलाबाई : (बाहेरच्या चाफ्याकडे पहात) काय सांगावं... खिडकीतून हात घालून सोनचाफ्याची फुलं काढायची संधी यापुढं मिळेल न मिळेल...

अण्णा : म्हणजे हे घर सोडून जायची तयारी झालेली दिसतेय तुझी.

वत्सलाबाई : आपण तीस वर्ष जरी इथं राहिलो असलो तरी ते भाडेकरू म्हणून !

अण्णा : भाडेकरू? अगं सख्ख्या मालकानं केलं नसतं इतकं केलंय आपण या जागेसाठी. पटवर्धनानी आपल्या सरदारकीचा काय वारसा ठेवला होता इथं, आठवतंय ना तुला? या जागेला जागा म्हणायची हिंमत झाली नसती कुणाची. जंगल होतं नुसतं. दिवसा- ढवळ्या देखील यायला घाबरायचे लोक. आपल्या शिकारीच्या छंदातून फुरसत काढून दोन घटका लोळायला मिळावं म्हणून पटवर्धनानी उभा केलेला दोन खोल्यांचा आडोसा होता नुसता. आपण आलो तेव्हा तोही धड नव्हता. पाया खचलेला, भिंती ढासळलेल्या आणि त्यात भर म्हणून साप-विंचू आणि वटवाघळांच वास्तव्य!

वत्सलाबाई : कशाला उकताय ते भूतकाळाचं मढं?

अण्णा : मला माहिताय, माझ्या बोलण्याचा त्रास होतोय तुला. त्या कटू आठवणींची खपली उडून दु:ख भळभळत बाहेर पडू नये म्हणून काळजी घेतेयंस तू. पण मी गप्प बसू शकत नाही.

वत्सलाबाई : डॉक्टरानी सांगितलंय ना त्रास करून घ्यायचा नाही म्हणून?

अण्णा : (तंद्रीत) या जागेत वेठबगारासारखे राबलो आपण. झाडं-झुडूपं तोडून साफ केली. ढासळलेल्या भिंती पुन्हा उभ्या केल्या. हा वरचा मजला सुधारून घेतला. नवी कौलं घातली. खाली अंगण केलं. जास्वंद, मोगरा, प्राजक्ताची झाडं लावली. पुढच्या दारी तू तुझ्या हातानं हे चाफ्याचं रोप लावलंस, परसदारी तुळशी वृंदावन बांधलंस... गेल्या तीस वर्षांत या चाफ्याची मुळं जमिनीत जितकी खोल गेली नसतील ना, त्याच्या कितीतरी पटीनं अधिक या जमिनीशी असणाऱ्या आमच्या नात्याची मुळं अधिक खोल गेलेली आहेत... आणि तो पटवर्धन तिकडं मुंबईला मलबार हिलच्या अलिशान फ्लॅटात बसून तीस दिवसाच्या आत घर खाली करण्याची नोटीस देतोय... काय समजतो काय तो स्वत:ला... (संतापामुळं ते थरथरू लागतात. त्यातच त्याना खोकल्याची उबळ येते. वत्सलाबाई त्याना “शांत व्हा, शांत व्हा” असं म्हणतात. खालून प्रसादचा “काय झालं आई? अण्णा संतापलेत कुणावर?” असा आवाज येतो. पाठोपाठ प्रसाद वरती आलेला.)

प्रसाद : काय झालं अण्णा? तुम्हाला सांगितलं होतं ना की विनाकारण संतापायचं नाही म्हणून? पुन्हा बी.पी. वाढलं मागच्यासारखं तर हॉस्पीटलमधये ॲडमिट व्हावं लागेल. डॉक्टरांनी काय सांगितलंय ते लक्षात आहे ना?

अण्णा : काय करू मी? पटवर्धनांची नोटीस आल्यापास्नं मन सैरभैर झालंय माझं...

प्रसाद : हो. पण गोडबोले वकिलांचा सल्ला घेऊन त्याप्रमाणं पुढची पावलं उचलायची असं कालच ठरलंय ना आपलं?

वत्सलाबाई : आता तूच सांग बाबा त्याना!

प्रसाद : मी आज रजा टाकतोय गोडबोल्याना भेटण्यासाठी. त्यांच्या कानावर घालतो सर्व प्रकार आणि काय म्हणतात ते बघतो. पण कायदा आपल्या बाजूनं आहे हे लक्षात ठेवा.

वत्सलाबाई : पटवर्धन या थराला जातील असं वाटलं नव्हतं. जाणीव ठेवली नाही त्यांनी. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत कधी या घराची डागडुजी करावी, रंगरंगोटी करावी असं वाटलं नाही त्यांना. कधी एक छदाम देखील त्यासाठी पाठवला नाही त्यानी... आणि आता जागांच्या वाढत्या किमती पाहून तोंडाला पाणी सुटलं... परमेश्वराची मर्जी!

अण्णा : हा कुणाच्या मर्जीचा प्रश्न नाही. हे घर राहायला दिलं म्हणजे काही मेहेरबानी केली नाही आपल्यावर. गेली तीस वर्ष दरमहा न चुकता भाडं पाठवतोय ना त्यांना?

प्रसाद : या मुद्याचा कोर्टात फायदा होणारये आपल्याला!

अण्णा : पण मी म्हणतो कोर्टात जाण्याची वेळच का यावी आपल्यावर? पटवर्धन इथं येऊन आपल्याशी बोलू शकत नव्हते? किंवा त्यांनी बोलावलं असतं तर आपण मुंबईला गेलो नसतो? नोटीशीच्या एका निर्जिव चिटोऱ्यानं तीस वर्षाचे स्नेहबंध क्षणार्धात तोडून टाकले त्यांनी... वत्सलाबाई : प्रसाद तू आवर पाहू. तुझी निघायची वेळ होईल आता. असेच बोलत बसलात तर वेळ कसा निघून गेला ते कळणारही नाही. सुमित्राचं आटपलं की नाही? सुमित्रा : (वर येत) आटपलंय माझं सर्व. वरती येतच होते आता. हार गुंफून परडीत ठेवलाय. म्हटलं चाफ्याची चार फुलंही द्यावी बरोबर.

वत्सलाबाई: बरं बरं...

सुमित्रा : सासूबाई, आज तुमच्यासोबत मीही देवळात येऊ का?

वत्सलाबाई: हो. चल की. मलाही तेवढीच सोबत होईल. (सुमित्रा फुलं काढण्यासाठी खिडकीजवळ जाते. तिला) जास्त झुकू नको बाहेर. ती काठी घे आकड्याची!

सुमित्रा : वा! काय घमघमाट सुटलाय फुलांचा. मन अगदी प्रसन्न होऊन जातंय.

प्रसाद : (गमतीने) माझ्याशी लग्न झालं म्हणून हे सुख भोगायला मिळतंय तुला.

सुमित्रा : गैरसमज आहे तुमचा...

प्रसाद : म्हणजे?

सुमित्रा : मी तुमच्याशी लग्न केलं ते तुमच्याकडं बघून नाही, तर तुमच्या अंगणातल्या या चाफ्याकडं बघून, समजलं? (प्रसादसहीत सर्वजण हसतात. सुमित्रा खिडकीतून डोकावून कोणती फुलं काढायची हे पहाते) अण्णा : जपून काढ बरं का गं सुनबाई!

सुमित्रा : (आश्चर्याने) अय्या ऽऽऽ

वत्सलाबाई : काय झालं गं पोरी?

सुमित्रा : बघितलंत का सासुबाई, चाफ्यावर चिमण्यांनी घरटं बांधलंय!

अण्णा : खरं की काय?

सुमित्रा : (सर्वांना) प्रत्यक्षच येऊन बघाना! (सर्वजण खिडकीजवळ जमतात.)

प्रसाद : हो. खरंच की! ते बघा तिथं त्या खालच्या फांदीवर. (अण्णाना) दिसलं?

अण्णा : कुठं म्हणालास?

प्रसाद : ते बघा तिथं... ते खालच्या फांदीच्या बेचक्यात. अण्णा : हो... हो... दिसतंय खरं. (वत्सलाबाईंना) तुला दिसलं का गं?

वत्सलाबाई : हो दिसलं पण घरटं बांधण्याचं काम अजून संपलेलं दिसत नाही त्यांचं.

सुमित्रा : कशावरून?

वत्सलाबाई : त्या काय चिऊताई गवताची काडी चोचीत धरून बसल्यात तिकडे. आणि तो चिमणा बघा तिकडं कशी शेपटीची कमान करून चिरिचर करीत बसलाय तो!

प्रसाद : चला, म्हणजे अण्णा तुम्हाला टाईमपाससाठी आता या शेजारच्या कुटुंबाचा उपयोग होणार एवढं नक्की!

अण्णा : काय दुर्दैवी योग आहे पहा...

सुमित्रा : (फुलांसाठी काठी बाहेर घालत) कसला दुर्दैवी योग?

अण्णा : इतक्या वर्षात या झाडावर घरटं बांधावं असं कधी त्या चिमण्याना वाटलं नाही आणि आता जेव्हा त्यानी ते बांधणे सुरू केलंय तेव्हा आपल्या मात्र घराचं छप्पर कोसळण्याची वेळ आलेली आहे...

वत्सलाबाई : पुन्हा मनात विचार आणलात तुम्ही तो!

अण्णा : आणू नको तर काय करू? इथल्या मातीचा कण न् कण, वीट न् वीट, या झाडाचं पान न् पान ओळखतं आपल्याला. तीस वर्षाची एक प्रदीर्घ अशी सुखद सोबत दिलीय त्यानी आपल्या कुटुंबाला... आपल्या छोट्याशा संसाराच्या या मूक साक्षीदारांना जर बोलता आलं असतं तर त्यानी आपलं गाऱ्हाणं पटवर्धनांपर्यंत नेलं असतं. ‘तुमचा या जागेवर कवडीचाही हक्क नाही’ हे ठणकावून सांगितलं असतं त्यांना. (सुमित्रानं काठीने फांदी जवळ ओढून बाहेर झुकत काही फुलं काढलेली आहेत. ती ओंजळीत घेऊन त्यांच्याकडं ती पहात रहाते.)

प्रसाद : आधीच धीर सोडल्यासारखं काय करताय अण्णा? मी तुम्हाला सांगितलं ना मघाशी की हल्ली कायदा हा भाडेकरूच्या बाजूनं असतो म्हणून. तुम्ही कशाला काळजी करताय?

वत्सलाबाई : प्रसाद, जा बाबा तू लवकर आणि वकिलाला भेटून ये एकदाचा. काय असेल ते सांगून टाका म्हणावं. म्हणजे यांचा असा हा वारंवार संताप तरी होणार नाही. (अंधार होऊ लागतो.) आता या म्हातारपणात काय वाढून ठेवलंय परमेश्वरानं समोर ते त्याचं त्यालाच माहीत... चल सुनबाई!

सुमित्रा : चला, (अंधार. अंधारातून दूरवर देवळात वाजत असणाऱ्या घंटांचा आवाज ऐकू येत रहातो. हळूहळू तो आवाजी कमी होत जातो. पुन्हा प्रकाश येतो. एका महिन्यानंतरची सकाळ. अण्णा गॅलरीत बसून वर्तमानपत्र वाचताना दिसतात. काही क्षणांनी ते वरूनच वत्सलाबाईना हाक मारतात.)

अण्णा : अगं ऐकलंस का? अगं ए ऽऽऽ

वत्सलाबाई : काय म्हणताय?

अण्णा : काय करतेस खाली?

वत्सलाबाई : काही नाही, तांदूळ निवडत होते.

अण्णा : वरती घेऊन ये की मग...

वत्सलाबाई : ठीक आहे. आले... (अण्णा पुन्हा वृत्तपत्रात डोके खुपसतात. काही क्षणांनी वत्सलाबाई तांदळाचं सूप घेऊन वरती येतात.) काय म्हणताय?

अण्णा : काही नाही ग एकटं एकटं वाटायला लागलं वर, म्हणून म्हटलं तुला बोलवावं...

वत्सलाबाई : इथं तांदूळ निवडण्याइतका प्रकाश येत नाही म्हणून खालीच बसले होते.

अण्णा : माझा चष्मा देऊ का?

वत्सलाबाई : इश्यऽऽ इतकी काही-

अण्णा : “म्हातारी झाले नाही मी!” असंच ना?

वत्सलाबाई : काय हे सकाळी सकाळी?

अण्णा : त्यात काय खोटं बोलतोय मी? बाहेर हे चाफ्याचं झाड आणि आत तू दोघेही सदैव फुलतच राहिलात माझ्या आयुष्यात.

वत्सलाबाई : अहो तुमच्या जिभेला काही हाड? (अण्णा दिलखुलास हसतात.) तरी बरं प्रसाद-सुमित्रा घरात नाहीत.

अण्णा : कुठं गेलेयत दोघंही?

वत्सलाबाई : सुनबाई सर्दी-खोकल्यानं बेजार झालीय. रात्री तापसुद्धा होता. सकाळी प्रसादला म्हटलं बाबा रे, आधी हिला डॉक्टरला दाखवून आण. तुमची पूजा चालू होती तेव्हा गेलेयत. येतील एवढ्यात...

अण्णा : बरं बरं.

वत्सलाबाई : आज भतीलच खुषीत दिसतेय स्वारी?

अण्णा : त्या पटवर्धनाच्या नोटीशीला चांगलं सणसणीत उत्तर पाठवलं ना तेव्हापासून खरोखरच खुषीत आहे मी. जवळ-जवळ महिना होत आला आता आणि तरीही तो काही उत्तर देऊ शकलेला नाही. म्हणजे आपल्याला घर सोडून द्यायला लावायचा विचार त्यांनी सोडून दिलेला दिसतोय.

वत्सलाबाई: परमेश्वराची कृपा.

अण्णा : परमेश्वरापेक्षाही खरंतर त्या गोडबोले वकीलांचीच कृपा म्हणायला हवं. त्यांच्या लक्षात जे मुद्दे आले ते परमेश्वराच्या तरी सुचले असते की नाही कुणास ठावूक!

वत्सलाबाई : पण आपण जर सगळं रेकॉर्ड व्यवस्थित ठेवलं नसतं तर त्या वकिलाला तरी काही करता आलं असतं का?

अण्णा : तेही खरंच आहे म्हणा. भाड्यापोटी पाठवलेल्या मनीऑर्डरच्या सगळ्या पावत्या जपून ठेवण्याची आपल्याला सुबुद्धी झाली. पटवर्धनांचे कारभारी वारल्यावर नगरपालिकेकडे आपणच कर भरला आणि त्याच्याही पावत्या ठेवल्या. पण गोडबोले काय म्हणत होते माहिताय?

वत्सलाबाई : काय म्हणत होते?

अण्णा : ते म्हणाले की यापैकी काहीही ‘डाक्युमेंटरी इव्हीडन्स’ नसता तरी केवळ या पत्यावर झालेल्या पंचवीस-तीस वर्षांच्या पत्रयवहाराच्या आधारे तुम्हीच या जागेचे मालक आहात असं मी सिद्ध करू शकलो असतो.
वत्सलाबाई : कमल आहे गं बाई या वकीलमंडळींची!

अण्णा : इतकंच काय पण गेल्या पंचवीस-तीस वर्षांत पटवर्धनांचं कोणीही इकडे फिरकलेलं नसल्यामुळं ‘ॲडव्हर्स पझेशन’ नं आपणच या जागेचे मालक ठरतो, हा आणखी एक मुद्दा काढलाय त्यांनी.

वत्सलाबाई : बघा बाई. आपल्याला काहीही कळत नाही त्यातलं. नाहीतर आयत्या वेळी घात करील तो गोडबोले.

अण्णा : काही घात करीत नाही. आता तारखा सुरू झाल्या म्हणजे तुलाही घेऊन जातो कोर्टात!

वत्सलाबाई : म्हणजे कोर्टात जायचं हे नक्की झालं आता? अण्णा : ते अजून ठरायचंय. पटवर्धनानी जर कोर्टात जायचा निर्णय घेतला तर ते वकीलामार्फत तसं कळवतील आपल्याला. (स्कुटरचा हॉर्न वाजतो.) आला वाटतं प्रसाद. बघ बरं जरा. (वत्सलाबाई उठून खिडकीजवळ जातात. बाहेर पहात.) नाही हो नाही. भलताच कोणीतरी निघाला तो! (त्या चाफ्याकडे पहात असताना एकदम आश्चर्याने) अगोबाई ऽऽऽ

अण्णा : काय झालं?

वत्सलाबाई: अहो आधी इकडे या. ते पहा...

अण्णा : काय झालं?

वत्सलाबाई : अहो इकडं तर या आधी!

अण्णा : (तिकडे जात) हं काय म्हणतेस, दाखव पाहू...

कुठेय काय?

वत्सलाबाई: अहो घरट्यात बघा... चिमण्यानी अंडीसुद्धा घातली...

अण्णा : अरे हो, खरंच की!

वत्सलाबाई : आता समजलं चिमण्यांना घरटं बांधायची घाई का झाली होती ती!

अण्णा : कसं समजत असेल या मुक्या जीवांना, नाही? वत्सलाबाई : अशा बाबतीत त्याना एक प्रकारची उपजत प्रेरणाच असते. कोणत्या प्रसंगी काय निर्णय घ्यावा याचं अचूक ज्ञान असतं त्यांना. मागच्या वेळी चिमण्यांनी घरटं बांधायला सुरूवात केली तेव्हाच हे लक्षात यायला हवं होतं आपल्या. पण आपण पडलो माणसं. संकटं अंगावर येऊन कोसळेपर्यंत बेफिकीरच रहातो आपण... घराच्या बाबतीत तरी दुसरं काय झालं?

अण्णा : म्हणजे?

वत्सलाबाई : मी अनेकदा सांगायची तुम्हाला की आपण

कुठंतरी आपल्या स्वत:च्या मालकीचा एखादा जमिनीचा तुकडा विकत घेऊ. आपलं स्वत:चं घरकुल बांधू...

अण्णा : तू म्हणत होतीस ते खरं होतं पण दुसरीकडून आपली कशी परवड होत होती तेही बघत होतीस तू. जो काही पगार यायचा तो घरखर्च चालिवण्यात आणि प्रसादच्या शिक्षणासाठी जात होता. शिवाय का कुणास ठावूक पण हे घर आपलं स्वत:चं आहे असं सतत वाटत रहायचं... म्हणून दुसऱ्या घराचा प्रश्न म्हणावा तसा मनावर घेतला नाही मी... जाऊ दे. आता विचार करून काय उपयोग. नाहीतरी गोडबोल्यांच्या मदतीनं आपण आता या घराचे कायदेशीर मालक होणारच आहोत. (हॉर्न वाजतो. वत्सलाबाईखाली पहातात. त्यांना प्रसाद दिसतो.) वत्सलाबाई : (मोठ्याने) वरतीच बसलोय रे आम्ही.

अण्णा : काय झालं सुनबाईला एकाएकी कुणास ठावूक! वत्सलाबाई : समजेल आता काय झालं ते! (प्रसाद, सुमित्रा येतात) ये बाबा,आलास? काय म्हणाले डॉक्टर? तू इकडं ये गं अशी. बैस इथं. बघू ताप आहे का तो? (तिच्या मानेला हात लावून पहातात).

सुमित्रा : नाही हो सासुबाई, ताप वगैरे काही नाही. वत्सलाबाई : मग काय झालंय? काय म्हणाले डॉक्टर? काय रे प्रसाद, बोलत का नाहीस तू?

प्रसाद : (उगाचच ताणत) काय बोलू आणि कसं बोलू... अण्णा : म्हणजे?

प्रसाद : माझ्याजवळ सांगायला शब्द नाहीत अण्णा.

वत्सलाबाई : अरे म्हणजे नेमकं झालंय तरी काय?

प्रसाद : तू आता आजी होणार. (वत्सलाबाई आनंदानं स्तिमीत होतात)

अण्णा : (अत्यानंदानं) काय म्हणतोस काय प्रसाद ?

प्रसाद : ही आजी म्हणजे तुम्ही आजोबा हे ओघानं आलंच! वत्सलाबाई : अलिकडे हिच्या तोंडाकडं बघतल्यानंतर मला शंका येतच होती. पण खात्री नव्हती. (तिची अलाबला काढत) औक्षवंत हो गं बाई. संसार चांगला फळा फुलाला येऊ दे तुझा.

प्रसाद : (वत्सलाबाईना) बघ... बघ, लाजून कशी चूर झालेय ती. (सुमित्रा अधिकच लाजते)

अण्णा : नको रे तिला चिडवू आता. आणि बरं का गं? दृष्ट काढून टाक सुनबाईची. आणि आधी तोंड गोड कर पाहू सर्वांचं.

वत्सलाबाई : करते बरं का... (अण्णाना) आणि नंतर बाजारात जाऊ आपण. रामाच्या देवळात नवस बोलले होते मी. पाच नारळांचं तोरण आणि सव्वाशेर पेढ्यांचा!

प्रसाद : कमाल करतेस हं आई तू. अगं कोणत्या युगात वावरतोय आपण आता?

वत्सलाबाई : म्हणजे?

प्रसाद : अपत्यसंभवाशी परमेश्वराचा काहीही संबंध नसतो.

वत्सलाबाई : तू मला वेडी म्हण की खुळी पण परमेश्वराच्या कृपेशिवाय झाडाचं पान देखील हलत नाही अशी खात्री आहे माझी.

प्रसाद : झाडाची पानं हलवत बसण्याचा रिकामटेकडा उद्योग परमेश्वराशिवाय दुसरं कोणीही करू शकणार नाही हे मात्र अगदी खरं! (हसतो)

वत्सलाबाई : (दुखावलेल्या) तुझा जन्म कसा झाला हे माहीत असतं तर असं बोलला नसतास तू.

प्रसाद : कसा झाला? सांग तरी!

वत्सलाबाई : विचार तुझ्या बाबांना!

अण्णा : अरे लग्न होऊन पंधरा वर्ष झाली तरी बाळ होण्याची काहीच चिन्हं दिसत नव्हती. डॉक्टर झाले, वैदू झाले, सारं काही झालं. शेवटी तुझ्या आईनं रामाला साकडं घातलं. व्रतवैकल्ये, उपास-तापास सुरू केले आणि मग मात्र तुझा जन्म झाला. परमेश्वराचा प्रसाद म्हणून तुझं नावही प्रसाद ठेवलं...

प्रसाद : इतक्या वर्षात कधी बोलला नाहीत अण्णा?

अण्णा : तसा प्रसंगच आला नाही कधी. तुझा जन्म कुठं झाला हे तरी माहिताय का तुला?

प्रसाद : कुठं झाला?

अण्णा : इथं. याच खोलीत जन्माला आलास तू. या सोनचाफ्याच्या झाडाचा शेंडा तेव्हा जेमतेम या खिडकीपर्यंत पोहोचत होता. ते झाड आणि तू दोघही नंतर झपाट्यानं वाढीस लागलात. संध्याकाळी तुझी आई तुला इथं खिडकीत कडेवर घेऊन 'चांदोबा, चांदोबा भागलास का' म्हणत जेऊ घालायची, मी बाराखडी शिकवायचो. रात्रीचं चांदणं या झाडांच्या फांद्यातून गाळून आत यायचं ते थेट तुझ्या अंथरूणावर! ही थोपटत थोपटत गोष्टी सांगत झोपवायची तुला...

वत्सलाबाई: (हरवलेल्या) इतिहासाची पुनरावृत्ती होते म्हणतात ती अशी. आपला नातूसुद्धा आता याच खोलीत जन्माला येणार. मीच करत जाईन त्याचं सर्व काही. त्याचं न्हाणं-धुणं, जेवणखाण सगळं... आणि बरं का तुम्ही त्याला बाराखडी शिकवायची!

प्रसाद : (हात जोडत) अहो मातोश्री पुरं झालं आता. तुम्हाला तुमची स्वप्नं रंगवायला अजून बरेच दिवस बाकी आहेत. आता आमच्या डब्याचं बघा जरा. ऑफिसात जायची वेळ होईल बोलता बोलता. (सुमित्रा उठू पहाते.) वत्सलाबाई : तू कशाला उठतेस सूनबाई? मीच करून देते त्याला आज पोळी-भाजी. तू आराम करायचा आता. आणि हे बघ सारखं-सारखं या जिन्यानं वरखाली करायचं नाही, बरं का?

अण्णा : (एकदम आठवून) अरे हो तुम्हाला एक गंमत सांगायची राहूनच गेली...

सुमित्रा : कसली गंमत?

अण्णा : (खिडकीकडे जात) इकडं या दोघानीही!

सुमित्रा : बघू कुठाय काय ते? (दोघेही खिडकीशी जातात)

अण्णा : नीट बघा. त्या घरट्यात बघा नीट. काय दिसतंय?

सुमित्रा : अय्या ऽऽऽ चिमण्यानी तर चक्क अंडी घातलेत. प्रसाद : खरंच की! इतक्या दिवसात लक्षातच आलं नाही.

वत्सलाबाई : म्हणजे आपल्या दोन्ही घरकुलात आता नवे पाहुणे येणार.

अण्णा : अगदी बरोबर! त्यांच्या स्वागताची तयारी आतापासूनच सुरू करायला हवी.

(खालून आवाज येतो.)

आवाज : अण्णा ऽऽऽ, अहो अण्णा ऽऽऽ, आहेत का घरात?

अण्णा : कोणीतरी हाक मारतंय वाटतं. (गॅलरीत येतात व वाकू न खाली पहात) कोण आहे? कोण हाका मारतंय? आवाज : मी वामन.

अण्णा : कोण वामन्या? अरे मग खाली काय करतोहेस, वर येकी.

आवाज : जरा गडबडीत आहे. ही चिठ्ठी द्यायची होती म्हणून आलो.

अण्णा : कसली चिठ्ठी?

आवाज : मुंबईला गेलो होतो. तिथं पटवर्धन भेटले. त्यांनी पाठवलीय.

अण्णा : पटवर्धनांची चिठ्ठी? जरा एक मिनीट थांब हं... (प्रसादला) जा बरं काय चिठ्ठी आलेय ती घेऊन ये. (प्रसाद जातो)

वत्सलाबाई : आता एकाएकी कसली चिठ्ठी आली पटवर्धनांची? यापूर्वी तर कधी चिठ्ठी-चपाटी पाठवल्याचं आठवत नाही.

अण्णा : समजेलच आता काय ते!

सुमित्रा : काय असेल असं वाटतं तुम्हाला?

अण्णा : दुसरं काय असणार? घर खाली करण्याची नोटीस मागं घ्यायची असेल त्याला. (वर आलेल्या प्रसादला) आण बघू इकडं (प्रसाद चिठ्ठी देतो) पाहूया काय म्हटलंय ते. (चिठ्ठी उघडून वाचतात. वाचता वाचता त्यांचे डोळे विस्फारत जातात. सारे कुटुंब त्यांच्या भोवती जमले आहे त्यावर प्रकाशझोत. बाकी सर्वत्र अंधार.)

अण्णा : घात झाला रे पोरा घात झाला!

प्रसाद : काय झालं?

सुमित्रा : काय लिहिलंय त्यात अण्णा?

वत्सलाबाई : काही बोलत का नाही तुम्ही? काय लिहिलंय चिठ्ठीत पटवर्धनानी?

अण्णा : (विस्कटलेल्या आवाजात) हे घर या जागेसहीत पटवर्धनानी सिंघानिया नावाच्या एका बिल्डरला विकून टाकलंय. तो बिल्डर लवकरच या जागेवर एक फार मोठा 'शॉपिंग कॉम्पलेक्स' उभारणार आहे... (सर्वजण स्तंभित. अंधार होत जातो. अंधारातून पाखरांचा भयत फडफडाट आणि चित्कार ऐकू येत रहातात.)

(प्रकाश. पंधरा-वीस दिवसानंतरची सकाळ. अण्णा अस्वस्थपणे येरझारा घालताहेत. वत्सलाबाई विचारमग्न स्थितीत शर्टला बटण लावीत आहेत. बटण लावून झाल्यानंतर त्या गाठ मारतात आणि दातानी दोरा तोडून अण्णांचा अंदाज घेत)

वत्सलाबाई : ऐकलंत का मी काय म्हणते ते?

अण्णा : काय म्हणतेस बोल?

वत्सलाबाई : प्रसाद सांगतोय ते ऐकायला हवं आपण असं मलाही वाटू लागलंय आता.

अण्णा : म्हणजे हे घर सोडून द्यायचं असंच ना? वत्सलाबाई : मला वीट आलाय अगदी त्या रोजच्या कटकटींचा. जे काही आयुष्य उरलंय हाताशी ते शांतपणे जगता यावं एवढीच अपेक्षा आहे माझी.

अण्णा : म्हणजे मी तुला शांतपणे जगू देत नाही असं म्हणायचंय का तुला?

वत्सलाबाई : मी फक्त इतकं च म्हणतेय की प्रसादचं ऐका तुम्ही.

अण्णा : म्हणजे काय करू?

वत्सलाबाई : सिंघानियाशी तडजोड करायला काय हरकत आहे आपल्याला?

अण्णा : जी गोष्ट मी आयुष्यभर केली नाही ती आता करेन असं वाटलं तरी कसं तुला?

वत्सलाबाई : आयुष्यात पहिल्यांदाच एखादी गोष्ट करण्याचा आग्रह धरतेय म्हणून!

अण्णा : तुझा आग्रह आणि माझी तत्वं यातल्या एकाची निवड करण्याची वेळ आलीय आता.

प्रसाद : (येत) आईचा आग्रह आणि तुमची तत्व या दोन्हीचा मान राहील असा सुवर्णमध्य काढू आपण.

अण्णा : म्हणजे काहीतरी तडजोड करायची असंच ना? प्रसाद : तडजोड करणं आपल्या हिताचं आहे असं वाटतं मला अण्णा.

अण्णा : आपल्या हिताच्या गोष्टी आता तू शिकवायला लागलास मला?

प्रसाद : शिकवत नाही अण्णा. सिंघानियाशी टक्कर घेणं आपल्यासारख्या गरीब माणसांना परवडणारं नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास आणतोय इतकंच.

अण्णा : तुझ्या त्या सिंघानियाला म्हणावं सगळ्या गोष्टी काही पैशानी विकत घेता येत नाहीत.

प्रसाद : तुमचा काहीतरी गैरसमज झालाय अण्णा. पैशाच्या जोरावर आपल्याला विकत वगैर घेण्याची कल्पना नाही त्याची.

अण्णा : जागा सोडून जाण्यासाठी पैशाची लालूच दाखवली नाही का त्यानं आपल्याला?

प्रसाद : त्याला 'विकत घेणं' असं म्हणत नाहीत.

अण्णा : सन्मानपूर्वक लाथ मारून हाकलण्याचा प्रकार आहे तो!

प्रसाद : आपलं कुटुंब वाऱ्यावर पडू नये म्हणून 'आऊट ऑफ द वे' जाऊन मदत करतोय तो आपल्याला. त्यानं स्वत: फोन करून हे सांगितलंय मला.

अण्णा : माझ्याशी सिंघानियाची वकली करतोहेस तू! प्रसाद : सिंघानियांन वकील फोडलाय आपला.(संगीत)

अण्णा : काय म्हणालास?

प्रसाद : खरं तेच सांगतोय अण्णा. गोडबोले कॉम्प्रमाईजची भाषा करीत होते परवा.

अण्णा : तो इतका लेचापेचा असेल असं वाटलं नव्हतं. वत्सलाबाई : आपण काही फुकट खटला चालवायला सांगितलं नाही त्यांना. पैसे मोजतोय...

प्रसाद : आपला संपूर्ण खटला चालिवण्यासाठी आपण किती पैसे देणार होतो त्याना?

वत्सलाबाई: पाच हजार रूपये.

प्रसाद : मग हा खटला चालवू नये म्हणून सिंघानियांनं गोडबोल्याना पंचवीस हजार रूपये देण्याचं मान्य केलंय. वत्सलाबाई : काय म्हणतोस काय पोरा?

प्रसाद : खरं तेच सांगतोय आई. सिंघानियाचा इस्टेट मॅनेजर ऑफिसमध्ये येऊन भेटून गेला मला. त्यानंच दिलेय ही माहिती.

अण्णा : ठीक आहे. जर असं असेल तर आपण दुसरा वकील देऊ.

प्रसाद : किती पैसे देणार त्याला? आणि आणणार कुठून एवढे पैसे? आपले कपडेलत्ते आणि भांड्याकुंड्यासहीत आपल्या प्रॉपर्टीचा हिशेब करायचा झाला तरी हाताच्या बोटावरच भागू शकेल. आणि दुसरा वकील आणणार कुठनं तुम्ही? वेळ पडली तर सिंघानिया अख्खा बार विकत घेईल.

अण्णा : बार विकत घेईल पण तुझ्या बापाला विकत घेणं त्याला कधीही जमणार नाही.

प्रसाद : पुन्हा तेच अण्णा. तुम्हाला विकत घेऊन काय फायदा होणार आहे त्याचा? हे घर त्यानं जागेसहीत पटवर्धनांकडून विकत घेतलंय. आपला हक्कं त्यानं

कोर्टामार्फत शाबीत करून घेतलाय. या खटल्यासाठी नेमण्यात आलेल्या खास लवादासमोर त्यानं त्याच्या कॉम्पलेक्सचा प्लॅन सादर करून मंजुरी मिळवलीय. फंड्स ॲव्हेलेबल असल्याचं सिद्ध करून दाखवलंय. जागेचा ताबा घेण्याचे आदेशसुद्धा मिळवलेत. इतकं असूनही आपल्याला संधी देण्याची काय गरज होती त्याला?

अण्णा : कसली संधी देतोय? काय म्हणायचंय तुला? प्रसाद : त्यानं तीन पर्याय ठेवलेत आपल्यासमोर. एक म्हणजे तो आपल्याला रोख पैस द्यायला तयार आहे. दुसरं म्हणजे इथं उभारल्या जाणाया कॉम्पलेक्समध्ये एक फ्लॅट द्यायला तयार आहे. आणि दोन्ही नको असल्यास एखादी पर्यायी जागा मिळवून द्यायलाही तयार आहे तो!

अण्णा : पैसा किंवा वस्तुरूपानं, पण म्हणजे दिडक्यानीच किंमत करतोय ना तो आपली? या मातीपासून तोडू पहातोय ना आपल्याला?

प्रसाद : तुम्ही फार इमोशनल झालाय अण्णा. जागेची तीव्र  टंचाई असणाया या शहरात या मध्यवर्ती ठिकाणी जेव्हा सिंघानियाचा कॉम्प्लेक्स उभा राहील तेव्हा त्यात कमीत कमी शंभर नव्या कुटुंबाना आपला संसार थाटता येणार आहे हेही लक्षात घ्या तुम्ही.

अण्णा : हा प्रश्न शंभर कुटुंबाच्या सोयीचा नसून एका

कुटुंबाच्या वाताहतीचा आहे हे लक्षात घेत नाहीस तू? त्याच्या या सहानुभुतीमागे आपला बळी देऊन इतरांचं पुण्यं मिळवण्याचा कुटील डावा आहे त्याचा. आयुष्यात मी कधी कुणाची सहानुभुती मिळवण्याचा प्रयत्न केला नाही.

प्रसाद : त्याबद्दल आम्हाला अभिमानच वाटतो तुमचा. पण हा प्रश्न तुम्ही आपल्या प्रतिष्ठेचा करताय असं वाटतंय मला.

अण्णा : प्रसाद!

प्रसाद : तुमच्या शब्दाबाहेर नाही मी अण्णा. प्रसंगी तुमच्या वडिलकीचा मान ठेवण्यासाठी तुम्ही चुकीची गोष्ट करायला सांगितलीत तरी तीही करीन पण काल सिंघानियाचं निर्वाणीचं पत्र आलंय. त्यानं म्हटलंय की “मी तुम्हाला आवश्यकतेपेक्षा जास्त संधी दिली.” तुम्ही तर बघताच आहात रोज. त्याचं सामान येऊन पडलंय इथं. जेसीबी येऊन उभी आहे,खडी-सिमेंट आलं आहे, मिक्सर आले आहेत. त्याचे कामगार तुमच्या निर्णयाअभावी बसून राहिल्यामुळं त्याचं आर्थिक नुकसान होतंय. “उद्या नाईलाजानं बुलडोझर आणून घर पाडावं लागेल” असं स्पष्टपणं लिहिलंय त्यानं... (बुलडोझरचा घरघराट ऐकू येतो. “अगबाई आवाज कसला येतोय” म्हणून वत्सलाबाई खिडकीकडे जातात.)

वत्सलाबाई : अगंबाई खरंच, बुलडोझर पाठवला हो त्यानं. काय आलं हे नशिबी?

अण्णा : (व्यथित) घाल म्हणावं बुलडोझर... पाड भिंती... उध्वस्त करून टाक हे घर, हा चाफा, हा परिसर. जाळून टाक म्हणावं आमचं चिमुकलं भावविश्व तुझ्या त्या राक्षसी महत्वाकांक्षेच्या आगीत आणि उभार त्याच्यावर तुझा तो गगनचुंबी कॉम्प्लेक्स... पण म्हणावं आधी बुलडोझर फिरव तो माझ्या छातीवरून...

वत्सलाबाई : अहो असं काय अभद्र बोलताय काहीतरीच!

प्रसाद : प्लीज त्रास करून घेऊ नका अण्णा. डॉक्टरांनी सांगितलंय ते ऐकायचं आता...

अण्णा : मला काहीच त्रास होत नाहीए रे पोरा. फक्त आश्चर्य  वाटतंय ते, काळाच्या झंझावातात माणूस किती बदलून गेला त्याचं! गांधी- नेहरूंसारखी विशाल अंत:करणाची, कणखर व्यक्तिमत्वाची माणसं जवळून पाहिली मी. त्यांचे आदर्श घेऊन आयुष्यभर ताठ मानेनं जगत राहिलो. पण माणसा-माणसात संकुचितपणाच्या भिंती उभ्या करणारा, पैशाला परमेश्वराचं महात्म्य मिळवून देणारा काळ पहाणंही निशिबी याव यासारखं दुर्दैव नाही! मनात आलं असतं तर काळे धंदे करून किंवा सवंग राजकारणात पडून मीही संपत्तीचा संचय करू शकलो असतो, इमले उभारू शकलो असतो... तीस वर्षांपूर्वी जेव्हा इथं आलो तेव्हा या मातीच्या आश्वासक स्पर्शामुळं तिच्याविषयी मनात एक आपुलकीचं नातं निर्माण झालं. हळूहळू वृद्धिंगत होत गेलं आणि या मातीतच आयुष्याची इतिश्री व्हावी असा मोह झाला इतकंच! मला काय माहीत की या जमिनीच्या तुकड्यावर कुण्या एका पटवर्धन नावाच्या माणसाचा हक्क असेल? मला काय माहीत की आपण आपल्या मानलेल्या जागेचा तो आपल्यासहीत एका बिल्डरशी सौदा करेल? पैशालाच सर्वकाही मानणाऱ्या अशा तत्वहीन माणसांच्या खांद्याचा आधार घेऊन पुढचं पाऊल उचलायचं हे मरणापेक्षाही भयंकर आहे आणि म्हणूनच त्याला म्हणावं तुझा बुलडोझर पहिल्यांदा माझ्या छातीवरून फिरव...

सुमित्रा : (वर येते. तिने पदराआड काहीतरी आणलंय. ती आश्वासकपणे हाक मारते) अण्णा...

वत्सलाबाई : तू कशाला वर आलीस सूनबाई? सारखी सारखी चढ-उतर करायची नाही असं बजावलंय ना तुला? प्रसाद : आणि पदराआड काय लपवून आणलहेस ते? सुमित्रा : (सर्वांना दाखवत) हे पहा.

अण्णा : काय, सोनचाफ्याचं रोप? ते कशाला गं पोरी?

सुमित्रा : मी सगळं बोलणं ऐकत होते तुमचं. ऐकता ऐकता मध्येच उठून मी अंगणात गेले. सोनचाफ्याच्या बुंध्याशी हे छोटसं रोप तरारून आलं होतं अलीकडेच. ते अलगद काढून आणलं... तुम्ही जे आदर्श उराशी बाळगलेत, आचरणात आणलेत आणि आम्हालाही घालून दिलेत तेच घेऊन पुढे जाणार आहोत आम्ही! तत्वांशी काडीचीही तडजोड न करता, कुणालाही विकले न जाता आणि कुणाचीही भीक न घेता ताठ मानेनं जगत रहाणार आहोत आम्ही... हे घर हा तुमचा वारसा नसून तुमचे विचार हा तुमचा खरा वारसा आहे अण्णा आमच्यासाठी!

अण्णा : लाख बोललीस पोरी, लाख बोललीस!

सुमित्रा : (निर्धारानं) आपण हे घर सोडून निघायचं.आत्ता.. या क्षणी.

अण्णा : तुझ्याकडून शब्दात पकडले जाण्याच्या या क्षणीही तुझ्याविषयी ऊर अभमानाने भरून येतोय सूनबाई!

सुमित्रा : मला तुम्हाला शब्दात पकडायचं नव्हतं अण्णा तर पाखरांचा संदेश द्यायचा होता.

अण्णा : पाखरांचा संदेश? लक्षात नाही आलं...

सुमित्रा : या इकडे असे. खिडकीजवळ या सर्वांनी. (सर्वजण खिडकीपाशी जमतात.) पहा सर्वांनी आता त्या घरट्याकडं. नीट बघा आणि सांगा काय दिसतय ते! वत्सलाबाई : अगंबाई घरट्यात अंडी दिसत नाहीत.

प्रसाद : गेली कुठं मग?

अण्णा : गेल्या आठवड्यात तर पाहिली होती मी.

सुमित्रा : घराच्या प्रकरणात तुमचं कुणाचंच लक्ष नव्हतं तिकडं. पाच सहा दिवसांपूर्वीच अंड्यातून इवली इवली गोजीरवाणी पिल्लं बाहेर पडली होती... मी पाहिली.

अण्णा : अस्सं? मग गेली कुठं ती आता?

सुमित्रा : ती पहा. वरच्या फांदीवर बघा सगळ्यांनी. (सर्वजण वर बघतात. तिकडून हळूहळू प्रकाशाचा सोनेरी झोत येतो. इतरत्र अंधार होत जातो.)

वत्सलाबाई : अगंबाई, बघताहेत बघा कशी टुकु टुकू.

सुमित्रा : नुसतीच बघत नाहीत तर आपल्याशी बोलू पहाताहेत. त्यांना काहीतरी सांगायचंय आपल्याला.

अण्णा : काय सांगायचय?

सुमित्रा : ते त्यांनाच विचारा ना.

प्रसाद : अरे अरे अरे तोवर उडूनसुद्धा चालली ती!

अण्णा : अरे खरंच की.

वत्सलाबाई : बाई गंऽऽऽ इतकी लहान लहान पिल्लं... पंखात पुरेशी ताकदसुद्धा अजून आली नाही त्यांच्या !

सुमित्रा : पंखात पुरेशी ताकदसुद्धा न आलेली ही पाखरं विशाल निळ्या आकाशाचं आव्हान स्वीकारून बाहेर पडलीत आज. आणि त्यांच्या या प्रयाणामुळंच आपल्यासमोरचा अंधारलेला रस्ता आता अधिक स्वच्छ, लखलखीत झाला आहे.

प्रसाद : म्हणजे?

सुमित्रा : या परिसरात जेव्हा दगड, माती, विटा, सिमेंट येऊन पडायला लागलं, यंत्रांचा खडखडाट आणि कामगारांची गजबज सुरू झाली तेव्हाच त्या पाखरांच्या लक्षात आलं होतं की आता आपला इथला मुक्काम हलवण्याची वेळ आली आहे. आणि म्हणूनच आपला निरोप घेऊन आणि आपल्यालाही निघण्याचा संदेश देऊन ती उडून गेली आता. या अंतहीन आकाशात फिरताना कुठंतरी एखादीतरी भरवशाची फांदी दिसेल त्यांना. तिथं ती उतरतील, विश्रांती घेतील, नवं घरकुल बांधतील. आपण तर माणसं आहोत. आपल्यालाही कुठंतरी असाच एखादा धरतीचा तुकडा मिळेल. तिथं आपण मुक्काम ठोकू. निवारा उभारू. मी माझ्या हातानी हे चाफ्याचं रोप लावीन तिथं. ज्या प्रमाणं इथलं हे चाफ्याचं झाड आणि प्रसाद एकमेकांच्या संगतीत वाढले, लहानाचे मोठे झाले त्याचप्रमाणे हे रोप आणि माझ्या पोटातलं बाळ वाढीस लागेल. संपत्तीच्या मोहापायी स्वाभिमान गहाण टाकायचा नाही ही शिकवण त्यालाही देऊ आपण. पटवर्धन-सिंघानियासारख्या माणसांच्या निष्ठा पैशाच्या चढउतारावर अवलंबून असतात. माणूसकी ही गोष्टसुद्धा त्यांच्या दृष्टीने तेजीमंदी करण्याची बाब असते आणि म्हणूनच सिंघानिया आपल्यासमोर तडजोडीचा तुकडा टाकू पहातोय. असल्या आंधळ्या आणि उन्मत्त माणसांच्या हिशेबी जागात अण्णा, तुमच्यासारख्या सरळ आणि स्वच्छ माणसाची किंमत केली जाणं मला अजिबात आवडलेलं नाही... म्हणूनच त्या पाखरांच्या हाकेला साद देत आता आपण बाहेर पडायचं. बाहेर आपलं घर होवो न होवो पण तुमच्या विचारांनी, आचारांनी आणि आदर्शानी आमच्या सर्वांच्या मनात आधीच एक असं घर बांधलेलं आहे की ज्याची जागा मनाच्या आकाशात धृवाच्या ताऱ्यासारखी अढळ आहे. चला...

तिघेही : (भारावून) चला निघुया! (पाखरांच्या आनंददायी कलकलाटाचा कल्लोळ ऐकू येऊ लागतो. हळूहळू अंधार. पडदा.)

***

सूचना : या एकांकिकेचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत. तिचे प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. तिचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, त्याचे अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील किंवा अशाच प्रकारच्या विद्यमान अथवा भविष्यात येऊ घातलेल्या माध्यमातून पूर्ण, अंशतः किंवा अशा कोणत्याही प्रकारच्या चित्रिकरण, ध्वनिमुद्रण,प्रसारणापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. यासंदर्भात काही वाद उद्भवल्यास संबंधित कायदेशीर कारवाई मुंबईक्षेत्रात होईल याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

प्रल्हाद जाधव

pralhadjadhav.one@gmail.com

9920077626

***